॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव-४२५ ००१
North Maharashtra University, Jalgaon-425 001
दुरध्वनी क्र. ०२५७-२२५७४९५, २२५८४९६

'A' Grade
NAAC Re-accredited

उमवि/२२/आयडियल //अंतर्गत/ २०१८ दि. ५/२/२०१८

## आयडीयलमध्ये प्रवेशित पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या परीक्षार्थी व पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी सुचना

- आयडीयल विभागाद्वारे पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांतर्गत ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यापासुन परीक्षा दिलेली नाही किंवा जे पुनर्परीक्षार्थी आहेत त्यांना सुचित करण्यात येते की, मे २०१८ मध्ये होणाऱ्या अंतीम लेखी परीक्षेचे आयोजन मे महिन्याच्या प्रथम किंवा द्वितीय आठवड्यापासुन करण्यात येत आहे. त्यासाठी दि. १५ फेब्रूवारी २०१८ पासुन १५ मार्च २०१८ पर्यंत विद्यार्थ्यांसाठी परीक्षा अर्ज उपलब्ध करुन दिले आहेत.

- परीक्षा अर्ज आयडीयलच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.वरील संकेत स्थळावर गेल्यानंतर डाव्या बाजुस असलेल्या Distance Education/IDEAL या लिंकवर क्लिक करावे त्यानंतर येणाऱ्या पेजवरील डाव्या बाजुस असलेल्या IDEAL Exam Forms २०१८ या लिंकवर क्लिक करावे.

- सदर लिंकवर क्लिक केल्यावर पीडीएफ फाईल ओपन होईल त्यानंतर फाईंड (Ctrl +F) ही कमांड वापरुन आपल्या नावाचा परीक्षा अर्ज शोधुन त्याचीच प्रिंट काढावी.

- कोणत्याही सबबीवर परीक्षा अर्ज भरल्याशिवाय परीक्षेस बसता येणार नाही. कारण विलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्याची सुविधा नाही.

- **ज्या विद्यार्थ्यांचे प्रथम, द्वितीय किंवा तृतीय वर्षाचे काही विषय बाकी असतील (Repeater) अशा विद्यार्थ्यांनी (प्रथम व द्वितीय वर्षातील काही विषय बाकी असतील तर प्रत्येक वर्षासाठी वेगवेगळे फी चलन भरावे लागेल. उदा. एम. ए. इतिहास प्रथम वर्षाचा एक पेपर व द्वितीय वर्षाचे दोन पेपर बाकी असतील तर प्रथम वर्षाचे एक चलन व द्वितीय वर्षाचे एक चलन असे दोन (२) चलन वेगवेगळे भरावे लागतील. स्वतंत्र वेगवेगळे चलन काढून ते सेंट्रल बँक ऑफ इंडीयाच्या जळगाव, धुळे, नंदूरबार या जिल्ह्यातील नजीकच्या शाखेत भरावयाचे आहेत.**

- सदर अंतीम लेखी परीक्षेचे आयोजन जळगाव, धुळे व नंदूरबार या तिनही जिल्ह्यातील खालील केंद्रांवरच होणार आहे याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी त्यानुसारच प्रिंट केलेल्या परीक्षा अर्जावर परीक्षा केंद्राच्या नावाचा उल्लेख हस्तलिखीत करावयाचा आहे.

| अ.क्र. | परीक्षा केंद्राचे नाव | जिल्हा | सांकेतांक |
|---|---|---|---|
| ०१. | क्रिडा रसिक शैक्षणिक संस्था इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च, जळगाव संचलीत ॲड. सिताराम (बबनभाऊ) आनंदरामजी बाहेती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जळगाव | जळगाव | १००००६ |
| ०२. | जयहिंद शैक्षिणिक संस्था संचलीत झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे | धुळे | २००००१ |
| ०३. | नंदूरबार तालुका विधायक समितीचे जी.टी.पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,नंदुरबार | नंदूरबार | २२००५३ |

- ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्जावर परीक्षा केंद्राचे नाव टाकले नाही त्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ जे परीक्षा केंद्र देईल त्याच केंद्रावर विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागेल याची नोंद घ्यावी.

- परीक्षा अर्जावरील आपले नाव, आईचे नाव, विषय तपासुन बरोबर असल्याची खात्री करावी. काही बदल असेल तर आयडीयल विभागाच्या ०२५७-२२५७४९५/०२५७-२२५८४९६ या दूरध्वनी क्रमांकावर लगेच संपर्क साधावा.

- परीक्षा अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख दिलेली आहे त्यानंतर आलेले परीक्षा अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी व त्यास संबंधित विद्यार्थीच जबाबदार राहील.

- परीक्षेचे वेळापत्रक एप्रिल २०१८ च्या दुसऱ्या आठवडयानंतर आयडीयलच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल व त्यानुसार परीक्षेच्या किमान ८ ते १० दिवस अगोदर हॉल टिकीट संकेत स्थळावरच उपलब्ध करुन देण्यात येईल.

- आपण जुलै- ऑगस्ट २०१५ मध्ये आयडीयलच्या वेबसाईटवरील नोटीस बोर्डवर सुचना टाकलेली होती की, ज्या विद्यार्थ्यांना आयडीयल विभागाद्वारे गुणपत्रक मिळाले आहे त्यावर डिस्टन्स मोड असा उल्लेख आहे परंतु दि. १६, एप्रिल २०१५ रोजी झालेल्या विद्या परिषद ठराव क्र. वि.प.ए-४८/२०१५ नुसार Distance Education ऐवजी External Mode असलेले सुधारीत गुणपत्रक छपाई करण्यात आलेली आहेत. सदर निर्णयानुसार विद्यार्थ्यांनी जर गुणपत्रक बदलवुन नेलेली नसतील त्यांनी परीक्षे अगोदर सदरची जुनी गुणपत्रके आयडीयल विभागात जमा करुन त्याऐवजी नवीन बदललेली गुणपत्रके घेऊन जावीत.

❖ **महत्वाच्या सुचना-**

- सदर अर्ज भरण्याची अंतीम मुदत **दि. १५ मार्च २०१८** ही असून पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी भरलेला परीक्षा अर्ज व त्यासोबत बँकेत भरलेल्या चलनाची Finance/IDEAL या नावाच्या चलनाची प्रत व मागील वर्षाच्या गुणपत्रकाची झेरॉक्स व एक पासपोर्ट फोटो इ. दस्तऐवज जोडुन खालील पत्त्यावर स्पिड/रजिस्टर पोस्टाद्वारे सदर तारखेच्या आत पाठवावेत.

- पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांतर्गत २०१७ मध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांतर्गत प्रथम वर्षास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी प्रिंट केलेला परीक्षा अर्जच पाठवायचा आहे

- वेळोवेळी संकेत स्थळावर माहिती प्रसिद्ध केलेली असते त्यामुळे विद्यार्थ्यांनी वारंवार संकेत स्थळास भेट द्यावी व जर काही बदल झाले असतील तर ते समजुन घेणे ही विद्यार्थ्यांची जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.

**परीक्षा अर्ज पाठविण्याचा पत्ता**

**मा. संचालक, आयडीयल विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, पिनकोड -४२५००१**

**संपर्कासाठी : दूरध्वनी क्र. ०२५७-२२५७४९५/२२५८४९६**

**सदर अंतीम परीक्षेसाठी आयडीयल विभागाद्वारे शुभेच्छा !**

**मा. संचालक,**
**आयडीयल विभाग**